# संवादिनी

जाणीव व वंचित विकासचे मासिक संवादपत्र

* वर्ष १३ वे *  * मार्च २०२२ *  * प्रसिद्धी- एप्रिल २०२२

अंक : पहिला




सप्रेम नमस्कार,

मराठी नवीन वर्षाच्या आणि आर्थिक वर्षाच्या खूप शुभेच्छा !

आपल्या सर्वांनाच हे मराठी नवीन वर्ष मंगलमय आणि आनंदाच्या रंगांनी भरलेलं जावो.

कोरोना १९च्या धुमाकुळात ३ वर्ष सरली. शारीरिक, मानसिक, खच्चीकरण झालं. कोरोनामुळे काय गमावलं याचा विचार करुन मन आणि शरीर थकले. आता या नवीन वर्षात काय करता येईल याचा विचार करु या.

'फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश
दरी-खोऱ्यातून वाहे एक प्रकाश, प्रकाश'

आम्हाला आपल्यासारख्या सुन्हुदांची आश्वासक साथ आहे आणि ती यापुढेही लाभेल हा विश्वास.

आपले,
मीना कुर्लेकर
सुनीता जोगळेकर
संचालक-वंचित विकास

## जागतिक महिला दिन २०२२च्या निमित्ताने

* मंगळवार दि. ८मार्च २०२२ - परिस्थितीशी टक्कर देऊन आपल्याबरोबरच इतरांचे जगणंही आनंदी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आत्मनिर्भर स्त्रियांना सन्मानीत करण्याचा अनौपचारिक सोहळा संस्थेच्या केंद्र कार्यालयात साजरा झाला. या कार्यक्रमातील सन्मानार्थी महिला या कुणी गृहिणी, कुणी स्वत:च्या अडचणींना सामोऱ्या जात असताना आपल्या सोबत आपले कुटुंब व इतरांचेही पालनपोषण करणाऱ्या, नोकरी सांभाळून संवेदनशीलतेने डायलिसिस रुग्णांना मदत करणाऱ्या, वस्ती पातळीवर काम करत अनेक संस्थांशी जोडलेल्या, आपली पेन्शन ही स्वत:साठी खर्च न करता समाजातील गरजूंना सढळ हाताने दान करणाऱ्या, वस्तीमध्ये पुरुषांसोबत काम करत असतानाही खंबीरपणे आपले स्वत:चे अस्तित्व निर्माण करणाऱ्या, स्वत:ची आर्थिक परिस्थिती नाजूक असूनही गावाकडील नातेवाईकांची मुले शहरात आणून आईच्या मायेने त्यांचा सांभाळ करणाऱ्या, मूत्रपिंडाच्या विकाराशी झगडून मृत्यू पावलेल्या वडिलांचे दु:ख झेलत जिद्दीने पदवी प्राप्त करणाऱ्या अशा अनेक महिलांचा सन्मान या वेळी करण्यात आला. सन्मानार्थींची नावे खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) श्रीमती श्रीकांता बिहाणी | २) कु. कादंबरी नाईक | ३) श्रीमती श्वेता ओतारी |
| ४) श्रीमती सुहासिनी बिवलकर | ५) श्रीमती रेश्मा कांबळे | ६) श्रीमती सुलोचना शिवशरण |
| ७) श्रीमती स्वाती भोसले | ८) श्रीमती स्नेहल किरतकर्वे | ९) श्रीमती रुपाली भालेकर |
| १०) श्रीमती सुप्रिया धोंगडे | ११) श्रीमती प्राची शिंदे | १२) श्रीमती अयोध्या म्हस्के |

सन्मानार्थींना मानाचा फेटा व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. डॉ. नीलम ताटके, संस्थेचे अध्यक्ष श्री विजयकुमार मर्लेचा व संस्थेचे देणगीदार श्री सुरेश परांजपे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

याच कार्यक्रमात संस्थेने आयोजित केलेल्या नवदुर्गा सन्मानाविषयी उत्कृष्ठ शब्दांकन करणाऱ्या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती देवयानी गोंगले, श्रीमती प्रतिभा शिंदे आणि श्रीमती पूजा पाटील यांचेही बक्षिस देऊन कौतुक केले.

* लातूर येथील मळवटी गावात ८मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त वंचित विकास सबला महिला केंद्र लातूरच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पूजा केली. गावच्या सरपंच श्रीमती कलावती कदम, ग्रामसेवक, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस एकल महिला, ज्येष्ठ महिला तसेच सर्व स्तरातील महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या. सर्व कर्तृत्ववान महिलांचे कौतुक केले. कार्यक्रमाला ४५ महिला उपस्थित होत्या.

* जागतिक महिला दिनानिमित्त दशमेगाव, वाशी येथे किशोरवयीन मुलींचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात ३५ ते ४० किशोरवयीन मुली सहभागी झाल्या.

* दि. ८मार्च २०२२ रोजी चंडिकादेवी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र,पाटणबोरी,जि.यवतमाळ येथे झालेल्या कार्यक्रमात प्रथम दिपप्रज्वलन करुन सावित्रीबाई फुले तसेच संस्थेचे संस्थापक कै.विलास चाफेकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन केले. नंतर पाहुण्यांचे स्वागत पुष्प देऊन करण्यात आले. स्वागतगीत सादर झाले. कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करुन उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन शिवणकाम प्रशिक्षण वर्गाविषयी तसेच केंद्रातर्फे सुरु असलेल्या इतर कामाविषयी माहिती देण्यात आली. पाहुण्यांच्या हस्ते शिवणवर्गातील प्रशिक्षणार्थिंना प्रमाणपत्र वितरण केले. प्रशिक्षणार्थी, पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वांना नाश्ता देण्यात आला. कार्यक्रमाला एकूण४० महिला, मुली व कार्यकर्ते उपस्थित होते.

* पुणे नगर वाचन मंदिर ही पुण्यातील अतिशय जुनी संस्था असून १७४ वर्षे ज्ञान प्रसाराचे कार्य करीत आहे. दि.७फेब्रुवारी २०२२ ते ६फेब्रुवारी २०२३ पर्यंत संस्था शतकोत्तर अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. यावर्षी जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला समाजतील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना पुणे नगर वाचन मंदिर येथे भेट देण्यासाठी निमंत्रित केले होते. गायक-वादक, एकपात्री कलाकार, शेअर मार्केटसंबंधी प्रशिक्षण देणाऱ्या, मोडी लिपीतील दस्तऐवजांचे मराठी रुपांतरीत करणाऱ्या, मुलांमध्ये काम करणाऱ्या एकूण ३५-४० स्त्रिया यावेळी येथे जमल्या होत्या. वंचित विकासच्या प्रतिनिधी म्हणून श्रीमती सुनीता जोगळेकर यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहून उपस्थितांना संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली.

## आम्ही चालवू हा पुढे वारसा!

उत्तम कार्यकर्ता घडण्याच्या दृष्टीने संस्थेच्या मानव निर्माण प्रकल्पाच्या अंतर्गत कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले जाते. कोरोना १९ मुळे नाईलाजाने स्थगिती द्यावी लागलेले प्रशिक्षण कार्यक्रम आता पुन्हा सुरु झाले. त्यामुळे संस्थेच्या कार्यकर्त्यांचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर दि.२६मार्च २०२२ ते २९मार्च २०२२ या कालावधीत वंचित विकास संचालित नीहार आनंद निवास,लोहगाव,पुणे येथे आयोजित केले होते. या शिबिरामध्ये संस्थेचे पुण्यातील तसेच महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या शिबिरामध्ये खालील विषयांवर वक्त्यांनी दृकश्राव्य तसेच प्रत्यक्ष सहभाग, चर्चा इ.माध्यमातून संवाद साधला –

| अ.क्र. | वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|---|
| १ | श्री शमशुद्दिन शेख | आपल काम आणि आधुनिक तंत्रज्ञान |
| २ | श्री आशिष गुरव | भावनिक बुध्दिमत्ता |
| ३ | श्री अक्षय कुर्लेकर | श्रीकृष्ण गीतेतील मार्गदर्शक तत्वे |
| ४ | डॉ.श्रीकांत गबाले | संवाद साधण्याची पध्दत |
| ५ | श्री अनुप ताबे | हिशोब |
| ६ | डॉ. अमेय वाघ | प्राणुसकी ते माणुसकी |
| ७ | श्री जीवराज चोले | मिडिया |

दि.२९मार्च २०२२ रोजी सर्व कार्यकर्त्यांची सहल ॲग्रो टूरिझमसाठी प्रख्यात असलेल्या अंजनवेल,पुणे येथे नेली होती. रोजच्या कामाचा ताण विसरुन सहलीचा सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला.

संस्थेचे कार्यकर्ते श्री मच्छिंद्रनाथ म्हेत्रे यांचे चिरंजीव श्री तन्मय म्हेत्रे हे इलेक्ट्रिकल इंजिनिअर असून पुढील शिक्षणासाठी त्यांना परदेशात जाण्याची संधी मिळाली आहे. त्यांनीही शिबिरात त्यांचा आजपर्यंतचा प्रवास सांगितला.

### तन्मय, मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा !

जाणीव युवाच्या शिबिरांमधून प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेल्या तरुणांनी आज संस्थेच्या वार्षिक शिबिरात मार्गदर्शन केले. हे या शिबिराचे वैशिष्ठ्य होते.

मुलं शिकली सवरली, मोठी झाली इतकच नाही तर आधुनिक काळाचं, नवनवीन तंत्रज्ञान व इतर गोष्टींच त्यांना भान आलं. नव्या काळाशी जुळवून घेत आपला व्यवसाय नोकरी सांभाळत हे तरुण आता सामाजिक कामाचे धडेही देऊ लागले. त्यांना ऐकताना, त्यांच्याकडून विषय समजून घेताना खूप कौतुक, आनंद आणि अभिमान वाटला.

**सर, आम्ही तुम्हाला खूप मिस केलं. हे बघायला तुम्ही हवे होतात.**

## लघु उद्योजकांच्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री

वंचित विकास संस्थेतर्फे विपरित परिस्थितीवर मात करुन 'पुनःश्च हरिओम' करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांच्या विविध उत्पादनांचे प्रदर्शन बालगंधर्व रंगमंदिर येथे दि.१४ व १५मार्च २०२२ रोजी आयोजित करण्यात आले. मा. नगरसेविका ॲड.गायत्री खडके व श्रीमती माधुरी सहस्त्रबुध्दे यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले.

संस्थेने कोरोनाच्या काळात छोट्या व्यावसायिकांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी अर्थसाह्य केले होते त्या व्यावसायिकांचे तसेच अन्य छोट्या व्यावसायिकांच्या उत्पादनांचे एकूण २५स्टॉल प्रदर्शनात होते. खाद्यपदार्थ, कपडे, कलाकुसरीच्या वस्तू, ज्वेलरी, पर्स, बॅग्ज, हर्बल कॉस्मेटिक्स, सेंद्रिय भाजीपाला व धान्य, गिर गायीचे तूप, मेंदी, तसेच ई-वेस्ट व सामाजिक संस्थेची माहिती देणारे स्टॉल होते.

व्यावसायिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत वंचित विकास संस्थेने त्यांना आधार दिला आहे. आता कोरोनाचे संकट कमी झाल्यानंतर हे व्यावसायिक जिद्दीने उभे राहताहेत, ही आनंदाची बाब आहे. पुणेकर नागरिकांनी अशा छोट्या व्यावसायिकांच्या उत्पादनांच्या प्रदर्शनाला प्रतिसाद देऊन त्यांच्याकडून उत्पादने खरेदी केली.

## * मुलांनी अनुभवले विज्ञान विश्व

दि.४मार्च २०२२ रोजी अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ, सहकारनगर शाखा व वंचित विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एक अनोखा कार्यक्रम आयोजित केला गेला.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूल,पुणे येथे १०अभिरुची वर्गातील सुमारे १०० मुलांनी अनुभवला शाळेत तयार करण्यात आलेला विज्ञान प्रकल्पाचा प्रदर्शनीय अनुभव !!

आधुनिक ड्रोन कॅमेरा तंत्रज्ञान, सोलर एनर्जी, विविध विज्ञान प्रयोग याच्या प्रत्यक्ष अनुभवाने, कोरोना काळात चार भिंतीआड लपलेले चिमुकले विश्व आज आनंदाने बहरुन गेले. मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्साह आजच्या कार्यक्रमाच्या यशाचे फलित सांगून गेले.

संस्थेचे हितचिंतक आणि देणगीदार श्री नितीन करंदीकर व शाळेचे मुख्याध्यापक श्री माने सर' यांनी संस्था काम करत असलेल्या वस्त्यांमधील ज्या मुलांना शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांना मोफत शिक्षण देण्याचेही आश्वासन दिले आहे.

मा. नगरसेविका श्रीमती स्मिता वस्ते, श्रीमती प्रियांका शेंडगे,याही कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

मुलांना खाऊ व शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.

## वाशी परिसरात बाल आनंद मेळावा उत्साहात

जाणीव संघटना व वंचित विकास संस्थेच्या वतीने वाशी तालुक्यातील बावी, झीन्नर, वाशी शिवशक्ती नगर प्राथमिक शाळा याठिकाणी बाल आनंद मेळावा घेण्यात आले. मुलांना गंमत वाटेल असे खेळ, गाणी, गोष्टी इ. माध्यमातून संस्थेचे कार्यकर्ते श्री रामभाऊ लगाडे व इतर स्थानिक स्वयंसेवकांनी मुलांना आनंद दिला.

## कोविड १९ लसीकरण

| दिनांक | वस्तीचे नाव |
|---|---|
| २/३/२०२२ | मीनाताई ठाकरे वसाहत,पुणे |
| ३/३/२०२२ | सरगम चाळ, स्वामी समर्थ नगर,अंबिका नगर,पवन नगर बिबवेवाडी,पुणे |
| ३ ते ५ मार्च २०२२ | लोहियानगर, पुणे |

वरील ठिकाणी झालेल्या लसीकरणाचा लाभ १८० लोकांनी घेतला.

ही लसीकरणाची मोहीम LOC HEALTH CARE LLP च्या डॉ.पूनम शहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांमुळे यशस्वी झाली.

## ** विनम्र आवाहन **

**संस्थेचे सर्व काम आपल्यासारख्या स्नेही आणि हितचिंतकांच्या सक्रिय सहभागामुळे प्रगतीच्या दिशेने सुरु आहे. आपण संस्थेसाठी बँकेच्या खात्यात देणगी जमा कराल त्यावेळी कृपया आम्हाला ७९७२०८६७३० या संस्थेच्या मोबाईल क्रमांकावर कळवावे. तसेच फॉर्म लिंक/QR कोड वरील माहिती भरुन पाठवावी. यामुळे आपल्याला त्वरित पावती पाठविता येईल.**

Google Forms

*** आपला Whats app क्रमांक तसेच ईमेल पत्ताही जरुर कळवावा.**

देणगीचा चेक/ड्राफ्ट वंचित विकास या नावाने द्यावा.

नेट बँकिंगसाठी तपशील खालीलप्रमाणे –

| | |
|---|---|
| खात्याचे नाव – | वंचित विकास |
| बँकेचे नाव – | स्टेट बँक ऑफ इंडिया |
| शाखा – | शिरोळे भवन, पी.एम.टी.बिल्डिंग,जंगली महाराज रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ |
| खाते क्र. | १११००३५५६७४ |

आय एफ एस सी कोड – SBIN 0001110

कोरोना १९ मुळे स्थगिती देण्यात आलेली वस्तुरुप देणगी स्वीकारण्यास आता सुरुवात केली आहे. कपडे देताना स्वच्छ असावेत, फाटके, खराब झालेले कपडे तसेच आतले कपडे स्वीकारण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. वस्तुरुपाने देणगी,नारायण पेठेतील केंद्र कार्यालयात स्वीकारली जाईल.

## मार्च २०२२ मधील आर्थिक स्वरुपात देणगी देणारे देणगीदार

१.श्री प्रणित जोशी,पुणे २.श्री अरविंद बापट,पुणे ३.श्री श्याम आमडेकर,पुणे ४.एस के के हेल्प,पुणे ५.श्री सुरेश परांजपे,पुणे ६.श्रीमती प्रिया रावते,पुणे ७.श्रीमती भाग्यश्री आगाशे,पुणे ८.श्री हरिष निरगुडे,पुणे ९.श्रीमती उषा शर्मा,पुणे १०.श्री अरविंद धारवाडकर,पुणे ११.श्री निनाद माटे,पुणे १२.श्रीमती ऋता गोखले,पुणे १३.श्रीमती दिपाली जंगम,पुणे १४.पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन,पुणे १५.श्रीमती करिश्मा बागडे,पुणे १६.श्रीमती सुनीता पारखे,पुणे १७.श्रीमती स्मिता जोशी,पुणे १८.श्रीमती स्वाती भोसले,पुणे १९.श्रीमती तृप्ती गुजर,पुणे २०.श्रीमती मनिषा सोनवणे,रेखा असवारी,पुणे

२१.श्रीमती किर्ती बावडेकर,पुणे २२.श्रीमती दिपा शहा,पुणे २३.श्रीमती शितल कोरटकर,पुणे २४.श्रीमती सुवर्णा शिंदे,पुणे २५.श्रीमती सई मोडक,पुणे २६.श्रीमती चैत्राली गायकवाड,पुणे २७.शासकीय मुलींचे निरीक्षण विशेष बालगृह,मुंढवा,पुणे २८.श्रीमती लावण्या बोझ्झा,पुणे २९.श्रीमती वसुधा भट,पुणे ३०.श्री अमेय जोशी,पुणे ३१.श्री विश्वास पटवर्धन,पुणे ३२.श्रीमती आशा थत्ते,मुंबई ३३.श्री बाळकृष्ण भागवत,मुंबई ३४.श्री मनोज मोकाशी,पुणे ३५.श्री कैलास गायकवाड,पुणे ३६.श्री दत्तात्रय देसाई,पुणे ३७.श्वेता असोसिएटस,पुणे ३८.श्री ऐश्वर्या जोशी,पुणे ३९.श्रीमती अस्मिता कदम,पुणे ४०.श्रीमती दिपाली भालेराव,पुणे ४१.श्रीमती शैलजा जोशी,पुणे ४२.श्री दत्तात्रय भंडारे,पुणे ४३.श्री जुगल राठी,पुणे ४४.श्री दिपक निरगुडे,पुणे ४५.कै.सौ.कमलाबेन रतिलाल शहा चॅरिटेबल ट्रस्ट,जयसिंगपूर ४६.श्रीमती शैलजा राव,मुंबई ४७.श्री शमशुद्दिन शेख,पुणे ४८.श्रीमती शुभदा उदगावकर,पुणे,४९.श्री विद्याधर पटवर्धन,पुणे ५०.श्री मनोहर भांडारकर,पुणे ५१.श्री उल्हास पाठक,पुणे ५२.श्री पुरुषोत्तम काशीकर,पुणे ५३.श्री संजय निंबाळकर,पुणे ५४.श्री अजित निंबाळकर,पुणे ५५.श्री विक्रम निंबाळकर,पुणे ५६.श्री रमेश निंबाळकर,पुणे ५७.श्री दिनेश निंबाळकर,पुणे ५८.श्री सुधीर फडके,पुणे ५९.श्री कमलाकर जाधव,पुणे ६०.श्री संजय कुडी,पुणे ६१.श्रीमती मिनाक्षी नवले,पुणे ६२.श्री विजय वालावलकर,पुणे ६३.श्री शिरीष पिंगळे,पुणे ६४.श्री चंद्रकांत जोशी,पुणे ६५.श्री सुनीत कुलकर्णी,पुणे ६६.श्री भालचंद्र आपटे,पुणे ६७.श्री प्रसाद कुलकर्णी,पुणे ६८.श्रीमती प्रविणा कुलकर्णी,पुणे ६९.श्री राजेंद्र मोहोळकर,ठाणे ७०.श्रीमती यामिनी कुलकर्णी,पुणे ७१.श्रीमती चारुता आराध्ये,ठाणे ७२.सायटेल स्टॅटिस्टिकल सॉफ्टवेअर अँड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे ७३.श्रीमती सुप्रिया भट,पुणे ७४.श्री आशिष गुरव,पुणे ७५.श्री अक्षय कुर्लेकर,पुणे ७६.डॉ.श्रीकांत गबाले,पुणे ७७.श्री अनुप ताबे,पुणे ७८.डॉ.अमेय वाघ,पुणे ७९.श्री जीवराज चोले,पुणे ८०.श्रीमती रेश्मा चोले,पुणे ८१.श्री दिलीप शिंदे,पुणे

## मार्च २०२२ मधील वस्तुरुपाने देणगी देणारे देणगीदार

१.श्रीमती शुभांगी मुंड्ये,पुणे २.श्रीमती सरोज टोळे,पुणे ३.श्री विजय जोगळेकर,पुणे ४.श्रीमती संजीवनी आपटे,पुणे ५.डेक्कन एज्युकेशन सोसायटी,पुणे ६.श्रीमती चारुशीला रानडे,पुणे ७. श्रीमती तेजस्विनी थिटे, पुणे ८. श्रीमती अरुंधती बापट, पुणे ९. श्रीमती शुभदा उदगावकर, पुणे १०. श्री मनोहर नागेश भांडारकर, पुणे ११. उल्हास पाठक, पुणे १२. निरंजन सोनी, पुणे


# वंचित विकास

**केंद्र कार्यालय :४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपती मागे, पुणे ४११०३०**

**फोन नं. : (०२०) २४४८३०५०/२४४५४६५८**

**मोबाईल नं. : ७९७२०८६७३०**

**ई मेल : vanchitvikas85@gmail.com**

**वेबसाईट : http://vanchitvikas.org**

**संस्था नोंदणी : महा/२५५३/८६(पुणे)**

**न्यास नोंदणी : एफ ३१२१ (पुणे)**



# संवादिनी

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**

**वंचित विकास**

४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपतीच्या मागे, पुणे ४११०३०

केवळ खाजगी वितरणासाठी (विनामूल्य)

**बुक-पोस्ट**


श्री/श्रीमती : ____________________